ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ


LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, ४ फेब्रुवारी, १९७०. | अंक ३




® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२ | तार : Vijayplow

### आशियातील सर्वांत लांब रेल-रोड पूल

गोदावरी नदीवर राजमहेंद्री (काकिनाड जिल्हा, आंध्रप्रदेश) येथे बांधण्यात येत असलेला पूल हा आशियातील सर्वांत लांब दुमजली रेल-रोड पूल होईल. त्याची लांबी ९,५५४ फूट भरेल. मद्रास-कलकत्ता मार्गावर हा पूल होईल. त्याला एकूण खर्च १०·५ कोटी रु. येईल. १९६४ साली आगगाडीच्या दोन रुळी मार्गाऐवजी चार रुळी मार्ग करण्यासाठी रेल्वे पुलाचे काम हाती घेण्यात आले, परंतु आंध्रप्रदेश सरकारच्या सूचनेवरून मूळ योजनेत फरक करण्यात आला. रेल्वेपुलाच्या डोक्यावर मोटारीच्या व इतर वाहतुकीसाठी रस्ता बांधण्याचे ठरले. त्यासाठी लागणारे जादा ३·५ कोटी रुपये आंध्रप्रदेश सरकारने देऊ केले. सध्या नदी ओलांडण्यासाठी बोटींचा उपयोग केला जातो किंवा ३२ किलोमीटर अंतरावर नदीचे दोन भाग होतात त्यावरील पुलावरून ती वाहतूक चालते. सध्याचा रेल्वे पूल आहे, त्यावरून मद्रास-कलकत्ता आगगाड्या जातील आणि नव्या पुलावरून कलकत्ता-मद्रास आगगाड्या जातील. नवा पूल जुन्या पुलाच्या पूर्वेस ३,५०० फुटांवर होईल. नवा पूल पुढील वर्षी वाहतुकीस खुला होईल.

---

### विमा हप्त्यातील घटीचा फायदा फक्त ६% विमापत्रकांना मिळणार

नफाविरहित विम्याचे हप्ते दरहजारी रु. ४·२५ ते रु. ०·७५ १ फेब्रुवारी, १९७० पासून उतरविण्यात आले आहेत. हप्त्याच्या रकमेत त्यामुळे ७·५% घट होत आहे. नफाविरहित सर्व विम्यांचा एकत्रित विचार केला, तर सरासरी घट ५% भरते. मोरारका कमिटीने फक्त नफाविरहित विम्याच्या हप्त्यात घट सुचविली होती. आयुर्विमा कॉर्पोरेशनचेही तेच मत आहे आणि सरकारही त्याच्याशी सहमत आहे. आयुर्विमा कॉर्पोरेशन आपल्या नफ्याच्या ९५% रकम नफ्यासहित विमाधारकांना बोनसच्या स्वरूपात परत करते. तेव्हा, नफ्यासहित विम्याचे हप्ते कमी केले असते, तर बोनसचा दरही उतरला असता. गेल्या मूल्यमापनात कॉर्पोरेशनने मुदतीच्या विम्यावर दर हजारी रु. १७·६ आणि हयातीनंतरच्या विम्यावर रु. २२ बोनस जाहीर केलेला आहे. नफाविरहित विम्याच्या हप्त्यातील कपातीमुळे कॉर्पोरेशनला पहिल्या वर्षी रु. ३ लक्ष कमी मिळतील. एकूण विमापत्रकांपैकी ६% विमापत्रकांना हप्त्यातील घटीचा फायदा मिळेल आणि बोनसवर त्याचा परिणाम होणार नाही.

---

### 'गोळ्यां'चा प्रयोग थांबविला

सुमारे ३,००० अमेरिकन स्त्रियांवर गेली दोन वर्षे तोंडाने खावयाच्या, छोट्या, संततिप्रतिबंधक गोळ्यांचा प्रयोग करण्यात येत होता. तो आता बंद करण्यात आला आहे. कारण, अशा गोळ्यांमुळे कुत्र्यांना वक्षःस्थळी कॅन्सर झाल्याचे आढळून आले.

---


**सरदारगृह**

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



**THE BELGAUM BANK LIMITED**

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

**Share Capital : Rs. Over 8 Lakhs**
**Reserves : Rs. Over 8½ Lakhs**
**Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs**

39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT**
*General Manager.*

**G. V. SARAF**
*Chairman.*

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ४ फेब्रुवारी, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## निर्गतवाढ असमाधानकारक आहे

निर्गतीच्या वाढीसंबंधी सगळीकडे चर्चा चालू आहे. परंतु १९६९–७० च्या पहिल्या आठ महिन्यांचा अनुभव आशादायक नाही. भारताची आयात कमी झाली आहे त्यामुळे आयात-निर्यातीमधील प्रतिकूल तफावतही कमी झाली आहे. परंतु, आयातीवर बंधने घातल्याने केवळ हा प्रश्न सुटणारा नाही; निर्गतीमध्ये भरपूर वाढ होणे आवश्यक आहे. आयात केलेल्या मालाची किंमत निर्यात केलेल्या मालाच्या किमतीनेच द्यावयाची असते; भारताच्या कर्जफेडीचा बोजा आता वाढत जाणार आहे, त्यासाठीही निर्गतीत खूप वाढ होणे जरुरीचे आहे. १९६८–६९ च्या पहिल्या आठ महिन्यांशी तुलना करता, भारताच्या निर्गतीत एक टक्कासुद्धा वाढ झालेली नाही! चौथ्या पंचवार्षिक योजनेत ७% वाढ गृहीत धरण्यात आली आहे.

१९६८–६९ मध्ये भारताने १,३६० कोटी रुपये किमतीच्या मालाची निर्गत केली होती. १९६७–६८ मधील निर्गत १,१९८ कोटी रु. किमतीची होती. म्हणजे, निर्गतीत सुमारे १६२ कोटी रुपयांची (१३%) वाढ झाली होती. ह्याच मुदतीत, आयात २,०७८ कोटी रु. वरून १,७८६ कोटी रु. वर उतरली होती. त्यामुळे, आयात-निर्गतीमधील तूट ९२२ कोटी रु. वरून ४३२ कोटी रु. वर आली होती. सध्याही आयातीचे प्रमाण कमी आहे. चालू वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यात भारताने १,००८ कोटी रु. ची आयात केली. त्यापूर्वीच्या वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत ती १,२४३ कोटी रु. ची होती. निर्गतीचे आकडे अनुक्रमे ९२२ कोटी रु. आणि ९१३ कोटी रु. असे आहेत. मुख्यत: आयात कमी झाल्यामुळे प्रतिकूल तफावत ३२९ कोटी रु. ची ८७ कोटी रु.वर आली. परंतु, तेवढ्याने समाधान मानता येणार नाही.

कुटुंबाच्या उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी करण्याचे दोन प्रकार असतात. एक म्हणजे अंथरूण पाहून पाय पसरायचे; पाय आखडते घ्यावयाचे. दुसरा प्रकार म्हणजे जरुरीइतके अंथरूण मोठे करावयाचे. पहिल्या प्रकारापेक्षा दुसरा प्रकार केव्हाही श्रेयस्कर. जास्तीत जास्त उत्पन्न मिळवून गरजा, सोयी, सुखे भागवता येणे हेच योग्य; उपासमार करीत जगणे श्रेयस्कर नव्हे. खूप मिळवावे, खूप उपभोगावे आणि खूप बचत करावी, अशी परिस्थिती कुटुंबांना आणि राष्ट्राला अनुभवास येणे उचित आहे. ह्या दृष्टीने, आयात कमी करून आयात-निर्गतीमधील तूट कमी करण्यापेक्षा निर्गत वाढवून म्हणजे परदेशांतील उत्पन्न वाढवून जरूर ती आयात करण्यास साधन निर्माण करणे हेच अंती श्रेयस्कर होय. निर्गतवाढीच्या ह्या महत्त्वाचे पार्श्वभूमीवर सद्य:परिस्थिती समाधानकारक नाही.

---

## अमेरिकेचे भारतात कुजत पडलेले ६७५ कोटी रुपये

अमेरिकेच्या मालकीचे ६७५ कोटी रुपये भारतात साठून पडून आहेत, त्यांचा योग्य विनियोग कसा करता येईल ह्याची पाहणी करण्यासाठी दोन अमेरिकन काँग्रेस सभासद भारतात आले आहेत. त्यांनी सरकारी अधिकारी आणि व्यापारी ह्यांच्याशी, त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांशी बोलणी केली. भारताला मान्य होणाऱ्या आणि भारताच्या अर्थव्यवस्थेला पोषक अशा रीतीने अमेरिकेच्या ६७५ कोटी रुपयांचा विनियोग व्हावा, अशीच अमेरिकेची इच्छा आहे. भारताच्या खाजगी क्षेत्रात त्यातील रक्कम गुंतविली जावी आणि त्यामुळे भारताला परदेशी चलन मिळविता यावे, अशा रीतीने गुंतवणुकीची योजना करता येईल, परंतु त्याबद्दल बोलणी करण्यासही भारत सरकार तयार नाही, अशी ह्या दोन काँग्रेस सभासदांनी तक्रार केली. काही अमेरिकन फर्म्सनी येथे येऊन पैसे कमवावे आणि ते येथेच खर्च करावे, हे त्या योजनांचे सूत्र आहे. येथील कितीतरी शेती-उत्पादनावर प्रक्रिया करून, त्याचे उत्कृष्ट पॅकिंग करून, सीलबंद करून निर्गत करता येईल; अमेरिकेचा उद्देश भारताला स्वत:च्या उत्पादनावर जगता यावे आणि त्याला आर्थिक तोल सांभाळता यावा, एवढाच असल्याचे त्या दोघांनी आवर्जून सांगितले. अमेरिका हिंदी अर्थकारणात ढवळाढवळ करील, अशी भीती भारत सरकारला वाटत असावी, असेही ते म्हणाले. एका अमेरिकन फर्मच्या अंदाजाप्रमाणे, भारतात १·४ कोटी घरांचा तुटवडा आहे, आणि हा तुटवडा कमी करण्यासाठी देऊ केलेल्या सहकार्याचे भारत सरकारने स्वागत केले नाही. "आमच्याकडे घराच्या तुटवड्याची समस्या नाहीच मुळी" असे सरकारने उत्तर दिले.

---

## जम्बो विमानांसाठी आपली तयारी कितपत आहे?

जंबो सुपरजेट विमानांच्या वाहतुकीसाठी भारतीय विमानतळ सुसज्ज आहेत, असे सरकारचे म्हणणे असले तरी ते खरे नाही. कारण, ती विमाने विमानतळावर उतरू शकली म्हणजे झाले, इतके ते सोपे नाही. बोइंगच्या ३५५ टनी सुपरजेटची लांबी २३१ फूट असेल. त्यातून ४९० उतारू प्रवास करतील. म्हणजे, सध्याच्या पाच विमानांतील उतारूंचा हा ऐवज झाला. एवढ्या उतारूंचे सामान व्यवस्थित उतरवून घेऊन ते ज्याचे त्याला लागलीच देणे, उतारूंची त्या त्या हॉटेलात त्वरेने रवानगी करणे, कस्टम्सचे काम तातडीने पार पाडणे, इत्यादी गोष्टींचे महत्त्व येथे पुरेसे जाणले गेलेले नाही. कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी प्रत्येक बॅग उघडून पालथी करून पाहण्याची पद्धत कायम ठेवता येणार नाही. प्रत्येक उतारूची लागलीच सुटका करण्याची त्यांना सवय करून घ्यावी लागेल. हॉटेलातील जागा मिळण्याची व्यवस्था त्वरेने करता आली पाहिजे. ह्या नव्या प्रचंड विमानातील सर्व गोष्टी आपोआप व्हाव्यात अशीच त्यातील यंत्ररचना आहे. विमान स्वतःच विमानतळावर अलगद उतरून तेथील पट्टीवरून हळूहळू जाऊन उभे राहू शकेल; हे सर्व होत असताना वैमानिक हात जोडून ते पाहात राहू शकेल, इतकी तांत्रिक प्रगती झालेली आहे. ह्याचा अर्थ, ज्या विमानतळावर विमान उतरणार, त्या विमानतळात विमानाला अचूक मार्गदर्शन करणारी इलेक्ट्रॉनिक यांत्रिक तरतूद व्हायला हवी. ह्या बाबतीत आपले विमानतळ कितपत सुसज्ज आहेत, हा खरा प्रश्न आहे. पॅरिस, लंडन आणि टोकियो येथीलच फक्त एकेक विमानतळ ह्या दृष्टीने सुसज्ज आहे. न्यूयॉर्कचा केनेडी विमानतळ सुसज्ज होण्यास १९७२ साल उजाडेल.

## युनिट ट्रस्टच्या रोख्यांच्या विक्रीत घट : राजकीय अस्थिरतेचा परिणाम

१९६९–७० च्या पहिल्या तिमाहीत युनिट ट्रस्टचे युनिटस् खूपच खपले. त्यामुळे, ३० जून, १९७० अखेरच्या बारा महिन्यांत युनिट्सची विक्री २५ कोटी रु. ठरेल अशी अपेक्षा निर्माण झाली होती. ३० सप्टेंबर, १९६९ अखेरच्या तिमाहीत १६.४१ कोटी रु.चे युनिट रोखे खपले. १९६८–६९ मधील तत्सम मुदतीत ११.०५ कोटी रु. चे रोखे खपले होते. १९६९ अखेरीस शेअर बाजारात मंदी पसरली आणि १९६९–७० च्या दुसऱ्या तिमाहीत फक्त २.३० कोटी रु. च्या रोख्यांची विक्री झाली. १९६८–६९ च्या तत्सम तिमाहीच्या मानाने विक्री कमी झाली आणि फेर-खरेदी वाढली. पहिल्या सहामाहीचा निवळ विक्रीचा आकडा ( १७.६२ कोटी रु. ) हा १९६८–६९ च्या पहिल्या सहामाहीच्या आकड्यापेक्षा ( १२.६० कोटी रु. ) बराच मोठा असला, तरी विक्रीची गती मंदावली आहे. राजकीय परिस्थिती सुधारली नाही, तर २० कोटी रु. पेक्षा जास्त किंमतीचे रोखे विकले जाण्याची शक्यता नाही. युनिट ट्रस्टची लोकप्रियता वास्तविक वाढत चालली आहे. १९६८-६९ अखेर ह्या रोख्यांमधील गुंतवणूक ५३.७६ कोटी रु. होती; ती १९६९ अखेर ७४.२५ कोटी रु. वर गेली आहे. युनिट रोखे धारकांची संख्या २.५५ लक्षांवरून ३.१३ लक्षांवर गेली आहे. उद्यो गधंद्यांची भरभराट असेल तरच शेअर बाजारातील उलाढाल वाढते आणि त्याबरोबर युनिट रोख्यांसही अधिक गिऱ्हाईक मिळते. जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रीयीकरण, शहरी मालमत्तेवर नियंत्रण, इत्यादी योजनांच्यासंबंधी जी राजकीय पुढाऱ्यांची वक्तव्ये चालू आहेत, त्यामुळे आणि येत्या अंदाजपत्रकातील अपेक्षित करवाढीमुळे शेअर बाजारातील मंदीचे वातावरण लवकर दूर होण्याची शक्यता दिसत नाही.

## जागतिक फौजदारीपेक्षा अंतर्गत प्रश्नांकडे अमेरिका अधिक लक्ष पुरविणार

अमेरिकेच्या जागतिक महत्त्वाकांक्षांना आळा घालण्याची आवश्यकता प्रेसिडेंट निक्सन ह्यांनी आपल्या 'स्टेट ऑफ दि युनियन' वक्तव्यात अप्रत्यक्षरीत्या स्पष्ट केली आहे. घरच्या समस्यांकडे अधिक लक्ष देण्याचे त्यांनी आपल्या देशबांधवांना आवाहन केले आहे. अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाचे तात्कालिक उद्दिष्ट व्हिएटनाम युद्ध थांबविणे, हे आहे. चीन आणि रशिया ह्यांच्याशी संघर्ष टाळणे, वाटाघाटीवर भर देणे, जगातील सर्व भागांतील देशांनी स्वतःच्या हिताची प्राथमिक जबाबदारी स्वतःच उचलावी, त्यांनीच स्वतःचे हित कोणते ते ठरवावे, इत्यादी आपल्या परराष्ट्रीय धोरणाची सूत्रे त्यांनी सांगितली. पश्चिम गोलार्धात रशियाबरोबर आणि पूर्व गोलार्धात जपानबरोबर सख्य राखणे, हा त्यांच्या परराष्ट्रीय धोरणाचा पाया राहील. जपानचे वाढते आर्थिक सामर्थ्य अमेरिकेला मान्य करावे लागले आहे. प्रत्यक्ष अमेरिकेतच दारिद्र्य निवारण, हवा-पाणी-जमीन ह्यांच्या दूषितीकरणाविरुद्ध उपाय, चलनवाढीस आळा, संघटित गुन्हेगारीचा बंदोबस्त, इत्यादी महत्त्वाच्या अंतर्गत गोष्टींवर भर देणे अमेरिकेन सरकारला आवश्यक झाले आहे. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने प्रवेश केला, तेव्हापासून गेली ३० वर्षे अमेरिका जगाचे नेतृत्व करू पाहात आहे. ह्या प्रवृत्तीची तपासणी करून वास्तव धोरण अंगीकारण्याची ही घोषणा अत्यंत दूरगामी महत्त्वाची आहे. त्याचे जागतिक परिणाम काय होतील हे आजच सांगता येणार नाही.

## चंद्रावरील पदार्पणासाठी १४,५५० कोटी रु. खर्च

गेल्या जुलैत दोघा अमेरिकन ॲस्ट्रॉनॉट्सनी चंद्रावर पदार्पण केले, त्याच्या सर्व तयारीस एकूण १४,५५० कोटी रुपये खर्च आला, असे अधिकृतरीत्या जाहीर झाले आहे. १९६१ साली हा कार्यक्रम ठरविण्यात आला, तेव्हापासूनचा सर्व खर्च ह्या रकमेत समाविष्ट आहे.

## खरी टंचाई आहे चारित्र्य आणि सचोटी ह्यांची

दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि चे अध्यक्ष

### श्री. एन्. ए. पालखीवाला

#### यांच्या निवेदनातील महत्त्वाचा गोषवारा

ज्या वेळी तर्कशुद्धता, स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्ती व नैतिक मूल्यांची जोपासना हे सारे कठीण व्हावे अशा भयसूचक काळखंडातून आपला भारत देश सांप्रत मार्गक्रमण करीत आहे हे विसरता येत नाही.

#### दरडोई उत्पन्नात फसवी वाढ

इतिहास हा दैवदुर्विलासितांनी नेहमी समृद्ध असतो. परंतु महात्माजींच्या मातृभूमीत आणि तेही त्यांच्या जन्मशताब्दीच्या सालीच त्यांच्या आर्थिक व राजकीय मतप्रणालीबाबत संपूर्णतया अनादराची भावना दिसून यावी व भारतीय राष्ट्रीय सभेत (इंडियन नॅशनल काँग्रेस) फार मोठी फाटाफूट व्हावी यापरते विचित्र असे विकारविलसित मानवी इतिहासात असू शकेल की काय, याची शंका वाटते. अन्य देशांतून तेथील प्रेषितांचाच धिक्कार होतो पण त्यांची विचारप्रणाली आपाततः झिडकारून द्यावयाची हे चमत्कारिक मानसिक धारणा असलेल्या भारतीयांनाच शक्य आहे.

#### निर्मितीपेक्षा अधिक वाटप आपण कसे करू शकणार ?

या भूमीत विविध संधी उपलब्ध व्हाव्यात हे आमच्या राज्यघटनेचे उद्दिष्ट आहे. पण आमच्या राजकारणी व्यक्तींनी त्याचे रूपांतर संधिसाधुपणात केले आहे. 'समाजवाद' या शब्दाचा त्यांनी जनतेवर संमोहनासारखा उपयोग केलेला आहे. आर्थिक गोंधळाचा परिपूर्ण आलेख, राज्यनियंत्रणाचा हानिकारक सुकाळ आणि बेकारी व आर्थिक पीछेहाट यांची एकसमे परिपूर्ण कल्पना देणारे चित्र म्हणजे 'समाजवाद' हा शब्द.

समाजवादप्रणीत आर्थिक प्रगतीची खरीखुरी तत्त्वप्रणाली, भारतातील प्रत्येक विचारवंत माणूस मोकळ्या मनाने मान्य करतोच आहे. राष्ट्राचे सामर्थ्य व प्रगती अबाधित राहून राष्ट्राचा विकास अविरत होत राहील, बहुजनसमाजाच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ होईल, व सर्वांच्या सुखसमाधानासाठी प्रत्येकाला अधिकाधिक फायदे उपलब्ध होतील अशा प्रकारे मानवी शक्ती व साधनसामग्री यांची योजनापूर्वक आखणी करून त्यांची योग्य प्रकारे नियुक्ती करणे म्हणजेच खराखुरा समाजवाद. अशा प्रकारचा समाजवाद प्रत्यक्षात आणण्यासाठी उच्च दर्जाचे बुद्धिचातुर्य, चारित्र्य व समर्पित जीवनाची तयारी यांची तीव्र आवश्यकता आहे.

पण वर निर्देश केलेल्या समाजवादाशिवाय आणखी एक प्रकारचा समाजवाद आहे. हा समाजवाद सहज सस्ता आहे. तो घोषणा आणि हवेतील आश्वासने यांवर पोसला जातो व जनतेची फसवणूक करून धष्टपुष्ट होण्याचा प्रयत्न करतो. हयातभर अनेकविध संस्कृतींचे परिशीलन केल्यानंतर विल ड्युरंट या तत्त्ववेत्त्याने इतिहासाची शिकवण म्हणून जे सार काढले आहे त्याला भारताच्या सद्यःस्थितीत फार फार महत्त्व आहे. ड्युरण्टमहाशय सांगतात, "सर्व प्रकारच्या शासनपद्धतींत लोकशाही ही सर्वांत कठीण अशी पद्धती आहे. कारण ती यशस्वी होण्यास बुद्धिचातुर्याची फार मोठ्या प्रमाणावर गरज आहे. पण आपण जेव्हा सार्वभौम होतो तेव्हा हुषार होण्याचे विसरून जातो."

चुकीच्या पद्धतीचा समाजवाद, हेच जर राष्ट्रीय धोरण ठरविण्यात आले तर उच्च दर्जाच्या राहणीमानाचे दिवास्वप्न आपण पाहू शकू पण हे स्वप्न प्रत्यक्षात साकार झाल्याचे मात्र आपण कधीही पाहू शकणार नाही. समाजवादाच्या घोषणांची नुसतीच मुक्त कंठाने दिलेली आश्वासने अर्थशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांना डावलू शकणार नाहीत; निर्मितीपेक्षा अधिक वाटप आपण कसे करू शकणार आहोत ?

#### दिशाभूल करणारे आकडे

१९६०–६१ सालात दरडोई उत्पन्न ३०६. ७ रु. होते. १९६३–६४ मध्ये ते ३६७ रु. होते; तर १९६४–६५ मध्ये ते ४२०. २ रु. इतके झाले आणि १९६८–६९ मध्ये हेच दरडोई उत्पन्न ५४५. ६ रु. इतके झाल्याचे दिसून येते. परंतु आकड्यांतील ही वाढ दिशाभूल करणारी आहे. कारण ती, रुपयाच्या किमतीत झालेल्या अवमूलनामुळे झालेली आहे. किमती अविचलित राहिल्या असत्या तर दरडोई उत्पन्नाचे आकडे खालीलप्रमाणे दिसले असते.

| | |
|---|---|
| १९६०–६१ | ३०६·७ रु. |
| १९६३–६४ | ३१९·२ रु. |
| १९६४–६५ | ३३३·६ रु. |
| १९६८–६९ | ३१९·२ रु. |

म्हणजे, किमती जर अविचल राहिल्या असत्या तर, १९६८–६९ सालातील दरडोई उत्पन्न हे १९६३–६४ सालात होते तितकेच राहते. १९६०–६१ सालापेक्षा ते फक्त ४ टक्क्यांनी अधिक आहे आणि १९६४–६५ सालापेक्षा तर ते कमीच आहे. आमच्या लोकसंख्यावाढीचा विचार केला आणि आम्ही प्रतिवर्षी जरी धीमी प्रगती म्हणून ६ टक्के वेग साध्य केला तरीसुद्धा २० वर्षांत आमचे दरडोई उत्पन्न फार तर दुप्पट होईल.

सांप्रत ज्या समस्या आमच्यासमोर आहेत त्या विचारांत घेता छोट्या व मोठ्या उद्योगधंद्यांतील फरकाला काही अर्थच उरलेला नाही. टंचाईच्या अशा या दशकात जर खरोखरी कशाची टंचाई असेल तर ती चारित्र्य व सचोटी यांचीच आहे. आणि या टंचाईचा उद्योगव्यवसाय लहानमोठा असण्याशी काहीच संबंध नाही. सामाजिक दृष्ट्या जबाबदार असलेले व अशी जबाबदारी न पाळणारे व्यवसाय यांच्यात खरोखरी एखादी सीमारेषा असण्याची आवश्यकता आहे.

———

## सभेच्या वेळी धूम्रपानास बंदी

जागतिक आरोग्य संघटनेच्या ( वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन) कार्यकारी मंडळाने आपल्या सभांच्या वेळी धूम्रपानास बंदी करणारा ठराव एकमताने मंजूर केला आहे. जा. आ. संघटनेच्या सर्व सात्यांनी ह्या ठरावाचे अनुकरण करावे, अशी अपेक्षा आहे. "अकाली निधन येण्याचे धूम्रपान हे एक प्रमुख परंतु टाळता येण्याजोगे कारण आहे" असे कार्यकारी मंडळाने म्हटले आहे. "सिगारेट म्हणजे मृत्यु ओढविण्याचे सर्वत्र फैलाविलेले साधन होय" असेही त्याने म्हटले आहे. जागतिक आरोग्य संघटनेचे अनुकरण येथील संस्था करतील काय ?

## गोव्यातील खतकारखान्याविरुद्ध वृथा ओरड

बिर्लांना गोव्यामध्ये खतकारखाना काढण्यास भारत सरकारने मंजुरी दिली, त्यावर काही राजकीय चळवळ्यांनी प्रतिकूल टीका केली आहे. श्री. बाबुभाई चिनाई ह्यांनी ह्या टीकेला उत्तर देताना म्हटले आहे, की सरकार अशा टीकेपुढे नमते घेऊ लागेल, तर त्यामुळे देशाचे नुकसान होईल. हरित क्रांती घडवून आणण्याचे कामी खतांचे उत्पादन आणि वापर ह्यांची फार मोठी कामगिरी आहे. त्यांच्या बाबतीत सरकारने दिरंगाई केली, तर त्यामुळे शेती आणि उद्योगधंदे ह्यांवर प्रतिकूल परिणाम होईल. मिठापूर योजनेसही सरकारने सत्वर मंजुरी द्यावी, अशी श्री चिनाई ह्यांनी मागणी केली आहे. मोठ्या उद्योगाबद्दल प्रतिकूल ग्रह बाळगून आर्थिक विकास थोपवून धरणे अहितकारक आहे.

## कोकणात सहकारी मार्केटिंगला दलालांचा अडसर

रत्नागिरी जिल्ह्याच्या विकासासाठी सहकारी संघटना स्थापण्यासाठी पात्रता आणि सचोटी असलेल्या उद्योगप्रिय व्यक्तींनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. झा ह्यांनी श्री. नाथ पै, एम. पी., ह्यांना पाठविलेल्या एका पत्रात म्हटले आहे. सहकारी मार्केटिंगच्या बाबतीत दलालांचे पसरलेले जाळे आड येत आहे. मच्छीमारीच्या प्रगतीला सहकारी मार्केटिंगची जोड मिळाली, तरच कोळ्यांना त्यांनी पकडलेल्या मासळीचे जास्त पैसे मिळू शकतील. बँक ऑफ इंडियाची कोकणासाठी आणि बँक ऑफ महाराष्ट्राची ठाण्यासाठी 'लीड बँक' म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

## दुष्काळग्रस्तांसाठी ३ कोटी व्हिटॅमिन गोळ्यांचे आगमन

युनिसेफकडून पश्चिम राजस्थानातील दुष्काळग्रस्त लोकांसाठी ३ कोटी व्हिटॅमिनच्या गोळ्या मिळत आहेत. एका खास विमानाने २ कोटी मल्टि व्हिटॅमिन गोळ्या आणि १ कोटी ए आणि डी व्हिटॅमिन गोळ्या दिल्लीच्या पालम विमानतळावर येऊन दाखल झाल्या.

## राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या कस्टोडिअन्सना आदेश

राष्ट्रीयीकरण झालेल्या १४ बँकांचा कारभार कस्टोडिअन्सच्या हाती देण्यात आलेला आहे, परंतु त्यांना मार्गदर्शक संचालक मंडळांची नियुक्ती अद्याप करण्यात आलेली नाही. अशा परिस्थितीत, ह्या बँकांचे काही व्यवहार रिझर्व्ह बँकेच्या पूर्वसमंतीशिवाय केले जावू नयेत ह्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने कस्टोडिअन्सना आदेश दिलेले आहेत. (१) २५ लक्ष रुपयांपेक्षा मोठी कर्जे, काही अपवाद वगळून, (२) कंपन्यांचे शेअर्स आणि डिबेंचर्स ह्यांत १ लक्ष रु. पेक्षा मोठी गुंतवणूक, (३) कंपन्यांचे शेअर्स आणि डिबेंचर्स ह्यांच्या तारणांवर ५ लक्ष रु. पेक्षा मोठी कर्जे, (४) वरिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक किंवा नोकरीच्या मर्यादेत वाढ, (५) जमीन व इमारत ह्यावर निर्दिष्ट रकमेपेक्षा जास्त खर्च, (६) नफ्यातून तरतुदी किंवा वर्गावर्गी.

## विमानतळावर चुंबनास बंदी

कैरो येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर निरोपाचे वेळी चुंबन घेण्याची बंदी करण्यात आली आहे. कारण, इतर उतारूंची त्यामुळे गैरसोय होते. जेथे बिगर उतारूंना जाण्याची परवानगी नाही, अशा ट्रान्झिट हॉलमध्ये मात्र चुंबनाला परवानगी कायम आहे.

## न पाळलेल्या अभिवचनांसाठी स्वतंत्र फाइल

अमेरिकेचे प्रेसिडेंट निक्सन ह्यांनी कारभाराच्या कार्यक्षमतेसाठी विषयवार फाइली ठेवल्या आहेत, त्यांत "न पाळलेली अभिवचने" ह्या शीर्षकाची एक फाइल आहे. ह्या फाइलीतील कागद वाढू न देण्याची दक्षता घेण्यात येते.


# नवी घडी—नवे जीवन

श्री. वा. काळे, संपादक अर्थ, ह्यांचे नवे पुस्तक

"जीवनात हरघडी अनुभवास येणाऱ्या विविध घटनांचे तत्त्वचिंतन मनोरम आणि हृद्य वाटले. नकळत जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन उत्साही, आशादायी व्हावा. विचारांचा ओघ आणि लिखाणातील सहजता यातून वाहणारे जीवनाचे तत्त्वज्ञान माणसाचे जीवन अधिक जगण्यासारखे करील, अशी आशा वाटते. समाजाचे जीवन समृद्ध होण्यासाठी आपल्या समर्थ लेखणीतून असेच लिखाण यापुढेही होत राहो, अशी नम्र आशा व्यक्त करण्याची परवानगी घेतो." पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. चे कार्यकारी संचालक, श्री. वि. ना. कायदे बी. ए. (ऑनर्स), एच. डी. सी, सी. ए. आय. आय. बी.

किंमत रु. ४. ☆ अभिनव पुस्तक मंदिर, पुणे ४

## तारापूर अणुवीज निर्मिती केंद्र

तारापूरच्या अणुवीज निर्मिती केंद्राचे उद्घाटन दि. १९ जानेवारी, १९७० रोजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते झाले. तारापूरच्या अणुवीज निर्मिती केंद्राचे उद्घाटन ही भारताच्या अणुशक्ती कार्यक्रमातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आहे. ऑगस्ट, १९५८ मध्ये भारताच्या पश्चिम भागात एक अणुशक्ती केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात येऊन त्याचा अंतर्भाव तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत करण्यात आला. मुंबई ते बडोदा या विभागातील संभाव्य २० जागांची पाहणी करून १९६० सालच्या वसंतऋतूत तारापूरची निवड झाली. पश्चिम विभागात झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिक गरजा लक्षात घेता अशा वीजपुरवठ्याची फार आवश्यकता होती. भूजन्य जळण व जलसाधनांच्या कमतरतेमुळे पारंपरिक वीजनिर्मिती कठीण झाली होती. पश्चिम विभागात पाण्याच्या मोठ्या साठ्यांचा अभाव नि नद्यांच्या पाण्याची अनिश्चितता यामुळे जलजन्य वीजनिर्मिती बेभरवशाची ठरण्याची शक्यता होती.

अशा परिस्थितीत अण्विक वीजनिर्मिती हा एकमेव पर्यायी उपाय होता. अण्विक विजेचा पुरवठा सतत मिळू शकतो व पाऊस कमी पडल्यास पाण्याच्या चणचणीमुळे उद्भवणाऱ्या अडचणींचा त्रास होत नाही. शिवाय असे केंद्र या विभागाला मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा करू शकेल ही बाब महत्त्वाची आहे.

तज्ज्ञांच्या मतानुसार तारापूर हे अण्विक वीजकेंद्रासाठी अत्यंत योग्य ठिकाण समजले जाते. यंत्रासामग्री थंड ठेवण्यासाठी दर दिवशी लागणारा २२० कोटी लिटर पाण्याचा साठा समुद्रसान्निध्यामुळे सहज लाभलेला आहे. विपुल वस्ती, कठिण पाषाण सडकांचा पाया व वेधशाळेला अवश्य असे वातावरण या सर्व गोष्टींची सोय या ठिकाणी आहे.

अणुशक्ती खात्याने या कामाचे कंत्राट देण्यासाठी साऱ्या जगातून टेंडर्स मागविली होती आणि ब्रिटन, फ्रान्स, कॅनडा व अमेरिकेतून आलेल्या एकंदर सात टेंडर्समधून प्रमुख कंत्राटदार म्हणून अमेरिकेच्या इंटरनॅशनल जनरल इलेक्ट्रिक कंपनीला नेमण्यात आले.

१९६३ साली या प्रकल्पासाठी अमेरिकेच्या "युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेन्ट" या संस्थेकडून सुमारे ६० कोटी रु. परदेशी चलनात मिळाले. त्यापैकी ३·७५ कोटी रुपयांच्या परदेशी चलनाची, देशातीलच साधनसामग्री वापरून बचत करण्यात आली. ऑगस्ट १९६३ साली प्रकल्पाच्या संबंधात एका भारत-अमेरिका द्विपक्ष सहकार करारावर पण सह्या झाल्या. या करारान्वये प्रकल्प चालू असेपर्यंत जळणाचा पुरवठा, संशोधनासंबंधीच्या गुप्त नसलेल्या व तांत्रिक विकासासंबंधी आणि प्लुटोनियमच्या वापराबाबत माहितीची देवाणघेवाण करण्याचे निश्चित झाले.

अमेरिकेच्या अणुशक्ती मंडळाने मे, १९६६ मध्ये झालेल्या करारान्वये सुमारे १०·८८ कोटी रु. किंमतीचे समृद्ध युरेनियम ऑक्साइडचे जळण प्राथमिक वापरण्यासाठी दूर मुदतीच्या कराराने दिले. याच कारणानुसार अमेरिकन अणुशक्ती मंडळ प्रकल्प चालू असेपर्यंत जळणाचा पुरवठा पण करणार आहे.

तारापूर अणुवीज केंद्राने देशाच्या इतिहासात एक नवे पान उघडले आहे. पुढील पाच वर्षांत देशात आणखी असे दोन प्रकल्प तयार होतील. ४०० मे. वॅ. शक्तीचे एक केंद्र कॅनेडियन सरकारच्या सहकार्याने राजस्थानातील राणाप्रताप सागर येथे उभारण्यात येत असून, दुसऱ्या २०० मे. वॅ. शक्तीच्या केंद्राची तामीलनाडूत कल्पकम येथे सुरुवात झाली आहे. कल्पकम येथील केंद्र पूर्ण झाल्यावर देशातील अणुतंत्र विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा गाठल्यासारखे होईल. कारण, या केंद्राची निर्मिती ८० टक्के भारतीय तंत्रज्ञांनी व साधनसामग्रीने होणार आहे.

---

## पाच प्रमुख शहरांचा ठेवींमधील आणि कर्जपुरवठ्यामधील वाटा

( व्यापारी बँका : डिसेंबर, १९६६ असेरचे आकडे )

( लक्ष रुपये )

| शहर | ठेवी: रकम | ठेवी: एकूणाशी प्रमाण | कर्जे: रकम | कर्जे: एकूणाशी प्रमाण | कर्ज-ठेवींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| अहमदाबाद | ८२,०३ | २·१ | ९५,३९ | ३·५ | ११६·३ |
| मुंबई | ७,८४,४४ | १९·८ | ८,०१,७२ | २९·२ | १०२·२ |
| कलकत्ता | ४,६७,४६ | ११·८ | ६,०१,९५ | २१·९ | १२८·८ |
| दिल्ली | ३,६४,३५ | ९·२ | १,३१,४६ | ४·८ | ३६·१ |
| मद्रास | १,०९,०७ | २·८ | १,६०,८० | ५·९ | १४७·४ |
| एकूण ( ५ शहरे ) | १८,०७,३५ | ४५·७ | १७,९१,३२ | ६५·३ | ९९·१ |
| एकूण ( भारत ) | ३९,६२,१९ | १००·० | २७,४७,०७ | १००·० | ६९·३ |

## टपाल व तार दळणवळणातील प्रगती

भारतात १९६० मध्ये ७०, ७१२ टपाल कचेऱ्या होत्या, त्यांची संख्या १ नोव्हेंबर, १९६९ रोजी १,०३,३७५ वर गेली; दर सहा खेड्यांपैकी एका खेड्यात टपाल कचेरी असून देशातील निम्म्याहून जास्त खेड्यांना रोज पोस्टमन बटवडा करतो.

मार्च, १९६९ च्या अखेरीस सेव्हिंग्ज बँकेचे व्यवहार करणाऱ्या टपाल कचेऱ्यांची संख्या ८०, ९५५ होती व त्यामध्ये सेव्हिंग्ज सार्टिफिकिटांसुद्धा ठेवींची एकूण रक्कम १६७९ कोटी रु. होती.

देशात आज १४,५९४ तार कचेऱ्या असून ३१ मार्च, १९६० रोजी अशा तार कचेऱ्यांची संख्या ११,१०९ होती. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात आणखी २,४०० कचेऱ्या उघडण्याचा संकल्प आहे.

सन १९४७ पासून टेलिफोन आणि टेलिफोन एक्स्चेंजमध्ये १९४७ पासून दहापट वाढ झाली आहे. देशात ३१ मार्च १९६८ रोजी १०,१७,००० टेलिफोन होते; १९६०, मध्ये ते ४,२४,००० होते.

३१ डिसेंबर, १९६८ च्या अखेरीस एकूण ९,९६१ टेलिप्रिंटर होते, त्यांपैकी ७७ टेलिप्रिंटरचे कळफलक देवनागरीत होते. एकूण सुमारे ६,५०० लाइन्सची क्षमता असलेले २६ टेलेक्स एक्स्चेंज आहेत. १२,००० लाईन्सची क्षमता असलेली आणखी २५ टेलेक्स एक्स्चेंज सुरू करण्याचा कार्यक्रम लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

---

## एलिझाबेथ टेलरच्या हिऱ्याच्या विमा

एलिझाबेथ टेलर ह्या सुप्रसिद्ध नटीने आपला सुप्रसिद्ध ६५ कॅरटचा हिऱ्याचा दागिना गळ्यात घातला, की तीन ऑस्ट्रेलियन विमा कंपन्यांना चांगले उत्पन्न मिळते. हिऱ्याची किंमत ९२ लक्ष रुपये आहे. हिऱ्याचा दागिना गळ्यात घालण्याचे प्रत्येक वेळी तिला १८,७०० रुपयांचा विमा हप्ता द्यावा लागतो; वर्षातून फक्त २० वेळा तो दागिना बँक व्हॉल्टमधून नेण्याची तिला परवानगी आहे.

---

## अमेरिकेच्या पहिल्या स्त्री-वैमानिकाचा मृत्यू

अमेरिकेची पहिली स्त्री-वैमानिक, मिसेस स्कॉट, ही वयाच्या ८४ व्या वर्षी नुकतीच मरण पावली. तिच्या वैमानिकाच्या एकूण आयुष्यात तिची ४१ हाडे मोडली होती.

---

## तुपाचे सर्वांत मोठे गिऱ्हाईक – तिरुपती देवस्थान

तिरुमलाई–तिरुपती देवस्थानाचे दैवत वेंकटेश्वर, हे आंध्र राज्यातील तुपाचे सर्वांत मोठे गिऱ्हाइक आहे. तिरुपती देवस्थान दरवर्षी ३० लक्ष रुपयांचे तूप घेते.

---

## कैरोमधील रशियन वसाहत

कैरो शहराजवळील ९ मैलांवरील लष्कर ठाण्यांवर इस्रेली फायटर बाँबर येऊ लागले आहेत. गेल्या हजार वर्षांत तुर्क, फ्रेंच, ब्रिटिश, ग्रीक, इटालिअन, अर्मेनिअन असे कित्येक परदेशीय कैरोने पाहिले; आता हजारो रशियनांचे वास्तव्य त्याला अंगवळणी पडले आहे. कैरो शेजारच्या झमालेक ह्या बेटावर मुख्यतः त्यांची वस्ती आहे. ते संगीत आणि नृत्य शिकवितात, वाळवंटात तेलासाठी विहिरी खणतात, कामगारांना मार्गदर्शन करतात, यंत्रे उभारतात, मंत्रालयांना सल्ला देतात, इजिप्शिअन वैमानिकांना आक्रमक हल्ल्यांचे शिक्षण देतात, सैनिकांना विमानहल्ले परतविण्यासाठी प्रक्षेपणाची तालीम देतात. इजिप्शिअन दुकानदार रशियन भाषेत बोलू लागले आहेत. रशियन लोकांनी आपल्या वसाहतीत क्लब, खेळण्याचे मैदान, शाळा, इस्पितळ, सिनेमागृह, पुस्तकांचे दुकान, इत्यादि सोई केल्या आहेत.

---

## १० रुपयांच्या तंट्यामुळे १० लक्ष रु. नुकसान

भाक्रा धरण आणि त्या संबंधातील इतर बांधकामे पंजाब सरकार करीत होते आणि त्याचा खर्च पंजाब आणि राजस्तान ह्यांनी वाटून घ्यावयाचा होता. १९५८ मध्ये भाक्रा कंट्रोल बोर्डाने खर्चाच्या हिश्श्याचे प्रमाण बदलले. त्यामुळे, राजस्तानच्या खर्चाच्या हिश्श्यात ३३·५२ लक्ष रुपयांची वाढ झाली. हिशेबातील १० रुपयांच्या तंट्यामुळे राजस्तानने सहा वर्षे काहीच केले नाही. आता हा वाद मिटला आहे. राजस्तानने ३३·५२ लक्ष रु. चे देणे मान्य केले आहे. परंतु हे देणे देण्यास ६ वर्षांचा अवधी लागला, त्यासाठी १० लक्ष रु. व्याज द्यावे लागणार आहे.

---

## अमेरिकेतील ज्यू लोकांना इस्राएलचे मदतीसाठी आवाहन

इस्राएलच्या पंतप्रधान मिसेस गोल्डा मेअर ह्यांनी १०० अमेरिकन ज्यू धनिकांना आणि पुढाऱ्यांना जेरुसलेमला इस्राएलच्या वाढत्या आर्थिक समस्यांच्या चर्चेसाठी योजिलेल्या तातडीच्या सभेसाठी बोलाविले आहे. इस्राएलचा परराष्ट्रीय चलन निधी जवळजवळ संपुष्टात आला असून अमेरिकेची आर्थिक मदत अजून विचाराधीन आहे. तेव्हा, मिसेस गोल्डा मेअर अमेरिकन ज्यूंच्या कडून ८० कोटी रुपयांची वर्गणी जमवू पाहात आहेत. इस्राएलचे कर्जरोखे अमेरिकेतील ज्यू उदारपणे खरेदी करीत असतातच. गेल्या वर्षी त्यांनी सुमारे १३० कोटी रुपयांचे रोखे घेतले. इस्राएलचे न्यूयॉर्कमधील भूतपूर्व राजदूत मायकेल अरनॉन ह्यांनी मुद्दाम अमेरिकेचा दौरा करून तेथील ज्यू धनिकांना सभेची खास निमंत्रणे केली.

SCG-1 HIN

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और निजी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और न्यायालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल आता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

६२ विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३१७२ कारखाना: ३७६१०१.



# पाणी... निसर्गाचें वरदान


वर्षाऋतूच्या आगमनाबरोबर सहस्रधारांनी पाऊस येतो आणि सर्व भूमि जलमय होऊन जाते. पण ओहोळ, नाले, नद्या यांतून हे पाणी वाहून गेल्यावर किंवा ते जमिनींत जिरून गेल्यावर पिके, कारखाने, शहरे आणि ग्रामीणवस्ती यांच्या पाणी पुरवठ्याचा यक्षप्रश्न पुढे उभा राहातो.
पाऊस फक्त वर्षांतून एकदाच पडतो, पण

**किर्लोस्कर पंप**

**पाहिजे तेथें**
**पाहिजे तेव्हा**
**पाहिजे तेवढा**
**अखंड पाणीपुरवठा करतात**

छोट्या बागायती, मोठ्या जलसिंचन योजना, कारखाने, ग्रामीण व शहरी पाणी पुरवठा अशा योजनांसाठीं लागणाऱ्या पंपाबाबत आमचे अेन्जिनिअर्स तुमच्या योजना अभ्यासून योग्य त्या पंपाची शिफारस करून तांत्रिक सल्ला विनामूल्य देतील. तुमच्या सविस्तर योजना कळवा.

प्रत्येक विशिष्ट गरजेसाठी स्वतंत्र किर्लोस्कर पंप
आणि प्रत्येक किर्लोस्कर पंप म्हणजे अनेक गरजांची पूर्ति ।



## किर्लोस्कर ब्रदर्स लि.

STUSA KM 3/67

हे पत्र पुणे पेठ, शिवाजीनगर घ. नं.९९५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)